दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## आजचे पंचांग

दिनांक : २६ जुलै २०२६ वार : रविवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : द्वादशी तिथी (दुपारी ०१:५७ पर्यंत) त्यानंतर त्रयोदशी तिथी नक्षत्र : ज्येष्ठा नक्षत्र (सकाळी ०७:३४ पर्यंत) त्यानंतर मूळ नक्षत्र योग : इन्द्र योग (रात्री १०:०४ पर्यंत) त्यानंतर वैधृति योग करण : बलवा करण (दुपारी ०१:५७ पर्यंत) त्यानंतर कौलव करण

## महिला पोलीस उपनिरीक्षक चैताली गपाट यांना नियमित जामीन

**पुणे :** ए दिघी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला पोलीस उपनिरीक्षक चैताली गपाट यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) दाखल केलेल्या गुन्ह्यात अटक केल्यानंतर माननीय अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, पिंपरी-चिंचवड यांनी नियमित जामीन मंजूर केला. न्यायालयाने ५० हजारांच्या जातमुचलक्यावर तसेच आवश्यक अटी व शर्तींसह हा आदेश दिला. आरोपीतर्फे अ‍ॅड. राकेश सोनार यांनी नियमित जामिनासाठी अर्ज दाखल करून सविस्तर युक्तिवाद केला. तपासासाठी आरोपीने पूर्ण सहकार्य केले असून, प्राथमिक तपास पूर्ण झाला आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 — रविवार, दि. २६ जुलै २०२६ — वर्ष - १ अंक - २९८ पाने - ४ — पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### मीम्स विरुद्ध मशिनरी'; ' जन जी जनरेशन' च्या डिजिटल लढाईने सत्ताधाऱ्यांसमोर नवे आव्हान?

**रील्स, मीम्स आणि विकेंद्रित मोहिमांमुळे सोशल मीडियावरील कथानक बदलल्याची चर्चा; पारंपरिक प्रचारयंत्रणेसमोर नवी कसोटी**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :**

परीक्षा व्यवस्थेतील कथित अनियमितता आणि तरुणांच्या प्रश्नांवरून सुरू झालेल्या आंदोलनाने केवळ रस्त्यांवरच नव्हे, तर सोशल मीडियावरही मोठी लढाई रंगली. या आंदोलनादरम्यान जनरेशन न ने मीम्स, शॉर्ट व्हिडिओ, रील्स आणि विकेंद्रित डिजिटल मोहिमांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. परिणामी, सोशल मीडियावरील चर्चेचा केंद्रबिंदू बदलल्याचे अनेक डिजिटल विश्लेषकांचे निरीक्षण आहे.

पारंपरिक राजकीय प्रचारात अधिकृत सोशल मीडिया हँडल्स, नियोजित संदेश आणि संघटित प्रचाराला महत्त्व दिले जाते. मात्र या आंदोलनात हजारो तरुणांनी स्वतंत्रपणे तयार केलेल्या व्हिडिओ, मीम्स आणि पोस्टमुळे चर्चेचा वेग आणि स्वरूप बदलले. अनेक ट्रेंड्समध्ये अधिकृत संदेशांपेक्षा वापरकर्त्यांनी तयार केलेल्या सामग्रीला अधिक प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

सरकारी निवेदने, पत्रकार परिषदांतील क्लिप्स आणि सार्वजनिक भाषणांतील भाग यांचा वापर करून उपरोधिक मीम्स आणि रील्स तयार करण्यात आल्या. या सामग्रीने विशेषतः तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रसार मिळवला. त्यामुळे सोशल मीडियावरील चर्चेत अधिकृत भूमिकेसोबत पर्यायी कथानकही प्रभावीपणे पुढे आले.

डिजिटल संवादाच्या या नव्या पद्धतीत कोणत्याही एका केंद्रीय नेतृत्वावर अवलंबून न राहता हजारो वापरकर्ते स्वतंत्रपणे सामग्री तयार करत असल्याने अशा मोहिमा अधिक वेगाने पसरतात. त्यामुळे पारंपरिक प्रचारयंत्रणांना या विकेंद्रित डिजिटल प्रवाहाला प्रतिसाद देणे अधिक आव्हानात्मक ठरू शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. या घडामोडींमुळे एक व्यापक प्रश्न पुढे आला आहेराजकीय संवादाचे स्वरूप बदलत आहे का? निवडणुका असोत किंवा जनआंदोलने, सोशल मीडियावरील प्रभाव आता केवळ अधिकृत आयटी सेल किंवा संघटित प्रचारावर अवलंबून राहिलेला नाही. तरुण वापरकर्त्यांनी तयार केलेली सामग्री, विनोद, उपरोध आणि जलद प्रतिसाद यांचाही जनमतावर परिणाम होत असल्याचे दिसून येते. या आंदोलनाच्या निमित्ताने डिजिटल राजकारणाचा नवा अध्याय समोर आला आहे. मात्र, कोणत्या पक्षाचा प्रचार प्रभावी ठरला किंवा कोणाचा कमी पडला, याचे निश्चित निष्कर्ष काढण्यासाठी स्वतंत्र आणि व्यापक डेटा-आधारित विश्लेषण आवश्यक आहे.

# अखेर सरकार झुकले?

## धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यानंतर मोदी सरकारच्या राजकारणासमोर नवे आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने केवळ एका मंत्र्याचा राजकीय प्रवास थांबलेला नाही, तर नरेंद्र मोदी सरकारच्या निर्णयप्रक्रियेवरही अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. जर एखाद्या मंत्र्याला विद्यार्थ्यांच्या दीर्घ आंदोलनानंतर आणि वाढत्या राजकीय दबावामुळे पद सोडावे लागत असेल, तर तो केवळ वैयक्तिक निर्णय राहत नाही; तो सरकारच्या राजकीय व्यवस्थापनाचा आरसा ठरतो.




मोदी सरकारची गेल्या अनेक वर्षांतील प्रतिमा ही कठोर निर्णय घेणारे आणि दबावापुढे न झुकणारे नेतृत्व अशी राहिली आहे. शेतकरी आंदोलन, नागरिकत्व सुधारणा कायदा (उअअ), विविध सामाजिक आंदोलने किंवा विरोधकांच्या राजकीय आक्रमणांदरम्यान केंद्राने अनेकदा आपली भूमिका ठाम ठेवली. त्यामुळे धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याला सामान्य राजकीय घटना म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही.

या संपूर्ण प्रकरणाचा केंद्रबिंदू विद्यार्थी होते. परीक्षा प्रक्रियेतील कथित त्रुटी, पेपरफुटीचे आरोप, प्रवेशातील गोंधळ आणि उत्तरदायित्वाची मागणी यामुळे देशभरातील तरुणांमध्ये अस्वस्थता वाढली. सुरुवातीला विद्यार्थ्यांचा आवाज म्हणून सुरू झालेले आंदोलन नंतर व्यापक राजकीय चर्चेचा विषय बनले. विरोधी पक्षांनी या मुद्द्यावर सरकारला घेरले आणि संसदेपासून रस्त्यापर्यंत दबाव कायम ठेवला.

लोकशाहीत आंदोलन हे वैध माध्यम आहे. मात्र कोणत्याही सरकारसमोर खरा प्रश्न असा असतो की, संवाद आणि निर्णय वेळेवर घेतले जातात का? जर परिस्थिती इतकी गंभीर झाली की अखेरीस मंत्र्यालाच पद सोडावे लागले, तर सुरुवातीला प्रभावी संवाद किंवा तातडीची कारवाई का झाली नाही, हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

राजीनाम्यामुळे सरकारला तात्पुरता राजकीय तणाव कमी करता येऊ शकतो; मात्र त्यामुळे शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत प्रश्न आपोआप सुटत नाहीत. विद्यार्थ्यांना आजही उत्तर हवे आहेपरीक्षा अधिक सुरक्षित होतील का, पेपरफुटी रोखण्यासाठी ठोस यंत्रणा उभी राहील का, भरती प्रक्रिया पारदर्शक होईल का आणि गुणवत्तेवरचा विश्वास पुन्हा निर्माण होईल का?

राजकीयदृष्ट्या पाहता, या घटनेचा संदेश भाजपसाठीही महत्त्वाचा आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये वरिष्ठ मंत्र्यांचा राजीनामा ही दुर्मिळ घटना मानली जाते. त्यामुळे विरोधक याकडे जनआंदोलनाच्या प्रभावाचे उदाहरण म्हणून पाहतील, तर सत्ताधारी पक्षाला जनभावनांकडे अधिक संवेदनशील राहण्याची गरज असल्याचा संदेश या प्रकरणातून मिळू शकतो.

आता सरकारसमोर खरी कसोटी सुरू होते. केवळ चेहरा बदलून चालणार नाही; धोरणात्मक सुधारणा, उत्तरदायित्व आणि विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी ठोस कृती करावी लागेल. कारण विद्यार्थ्यांचा प्रश्न हा कोणत्याही एका पक्षाचा नसून देशाच्या भवितव्याचा आहे.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने एक राजकीय अध्याय संपला असेल; परंतु मोदी सरकारसमोर आता अधिक मोठे आव्हान उभे राहिले आहेजनतेचा, विशेषतः तरुणांचा विश्वास पुन्हा जिंकण्याचे. सरकारची पुढील प्रत्येक पायरी आता अधिक बारकाईने पाहिली जाईल. कारण लोकशाहीत सत्तेची ताकद केवळ बहुमताने ठरत नाही, तर जनविश्वास टिकवून ठेवण्याच्या क्षमतेनेही ठरते.

## आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा

### 'पंढरपूर कॉरिडॉर' पुढील अडीच वर्षांत पूर्ण; कुणावरही अन्याय न करता पुनर्वसन करणार, मुख्यमंत्र्यांची ग्वाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पंढरपूर । प्रतिनिधी**

आषाढी शुद्ध एकादशीच्या पावन पर्वावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. यावेळी त्यांनी पंढरपूर मंदिर परिसराचा विकास 'पंढरपूर कॉरिडॉर' प्रकल्पाद्वारे करण्यात येणार असून, बाधितांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेत पुढील अडीच वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.



महापूजेनंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर, अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, सुरेश खाडे, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, दरवर्षी लाखो भाविक विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला येतात. मात्र मंदिर परिसर मर्यादित असल्याने भाविकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे अधिक प्रशस्त, आधुनिक आणि सुव्यवस्थित मंदिर परिसर उभारण्याची आवश्यकता निर्माण झाली असून, यंदाच 'पंढरपूर कॉरिडॉर' प्रकल्पाच्या कामाला प्रारंभ केला जाणार आहे.

कॉरिडॉर प्रकल्पाचे नियोजन स्थानिक व्यापाऱ्यांचे हित, नागरिकांचे पुनर्वसन आणि भाडेकरूंच्या हक्कांचा विचार करून करण्यात आले आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कितीही मोठ्या संख्येने भाविक आले तरी त्यांना उत्तम सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यंदाच्या वारीने नवा विक्रम प्रस्थापित केल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, दर्शनासाठी तब्बल २५ किलोमीटर लांब रांग लागली होती. सुमारे २५ तास प्रतीक्षा करूनही वारकरी विठ्ठलनामाचा गजर करत आनंदाने दर्शन घेत होते. चंद्रभागा नदी स्वच्छ ठेवण्यासाठीही विशेष उपाययोजना करण्यात आल्याने नदीकाठ स्वच्छ आणि सुंदर झाल्याचे त्यांनी नमूद केले.

शेतकरी, शेतमजूर, वारकरी आणि समाजातील सर्व घटकांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी, मोफत वीज आणि थकीत वीजबिल माफीसारखे निर्णय घेतल्याचेही सांगितले.

यावेळी शासकीय महापूजेचे मानकरी वारकरी बाबासाहेब माधव माने आणि प्रभावती माने यांचा मुख्यमंत्री व अमृता फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने त्यांना एक वर्षाचा मोफत एसटी प्रवास पास प्रदान करण्यात आला.

**'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्कारांचे वितरण**

जलसंवर्धन, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त वारी आणि वृक्षसंवर्धनासाठी जनजागृती करणाऱ्या दिंड्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्कार प्रदान करण्यात आले.

* प्रथम पुरस्कार – श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कौंडण्यपूर
* द्वितीय पुरस्कार – वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान, जालना
* तृतीय पुरस्कार – गोऱ्हेकर संस्था, आळंदी देवाची

विजेत्या संस्थांना सन्मानचिन्ह आणि धनादेश प्रदान करून गौरविण्यात आले.

## हिमालयाच्या लढ्यात सह्याद्रीची साथ'; विद्यार्थी आंदोलनात महाराष्ट्राच्या युवकांची ठळक भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई / नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

देशभरात परीक्षा व्यवस्थेतील कथित अनियमितता, पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर उभ्या राहिलेल्या आंदोलनात महाराष्ट्रातील युवकांची भूमिका विशेषत्वाने चर्चेत राहिली. दिल्लीपासून मुंबईपर्यंत झालेल्या निदर्शनांमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थी आणि युवा कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग दिसून आला. अनेकांनी या भूमिकेची तुलना हिमालय वाचवण्यासाठी सह्याद्री धावून आला या प्रतीकात्मक म्हणीशी केली.

कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी)चे नेतृत्व करणारे अभिजीत दिपके यांनी विद्यार्थ्यांचे प्रश्न राष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी सातत्याने आंदोलनाचे नेतृत्व केल्याचा दावा पक्षाकडून करण्यात आला आहे. जंतर-मंतरसह विविध ठिकाणी झालेल्या निदर्शनांमुळे परीक्षा व्यवस्थेतील उत्तरदायित्वाचा मुद्दा राष्ट्रीय चर्चेचा विषय ठरला.

या आंदोलनात महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी संघटना आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. शिक्षण व्यवस्था अधिक पारदर्शक करण्याची मागणी, पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर यंत्रणा आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, या प्रमुख मागण्यांवर आंदोलन केंद्रित होते.

दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत सहानुभूती व्यक्त करत आंदोलनकर्त्यांचे कौतुक केल्याचे संबंधित पक्षांकडून सांगण्यात आले. विविध राजकीय पक्षांनीही विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला.

राजकीय निरीक्षकांच्या मते, कोणत्याही मोठ्या राष्ट्रीय आंदोलनाला केवळ एका राज्याचे किंवा एका संघटनेचे श्रेय देता येत नाही. मात्र महाराष्ट्रातील युवकांनी दिलेली साथ आणि आंदोलनाला मिळालेली ऊर्जा यामुळे या लढ्याला व्यापक स्वरूप मिळाल्याचे मत व्यक्त केले जात आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करणे हा घटनात्मक अधिकार आहे. त्याचबरोबर अशा आंदोलनांमधून निर्माण होणारा दबाव शासनाला उत्तरदायी बनवण्यास मदत करू शकतो. त्यामुळे या आंदोलनाकडे केवळ राजकीय संघर्ष म्हणून नव्हे, तर शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा आणि विद्यार्थ्यांच्या अपेक्षांचा आवाज म्हणून पाहिले जात आहे. आज अनेक आंदोलनकर्त्यांच्या मते, हिमालयाच्या लढ्यात सह्याद्रीने दिलेली साथ ही केवळ भावनिक उपमा नसून, महाराष्ट्रातील युवकांनी राष्ट्रीय पातळीवरील विद्यार्थी प्रश्नांसाठी दिलेल्या सहभागाचे प्रतीक आहे. मात्र या आंदोलनाचे श्रेय एकट्या कोणालाही न देता, देशभरातील हजारो विद्यार्थ्यांच्या एकजुटीला आणि लोकशाही पद्धतीने उभारलेल्या जनआंदोलनालाच द्यावे लागेल.

## विद्यार्थ्यांच्या लढ्याला राहुल गांधींची साथ; धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यात विरोधकांच्या दबावाचीही ठळक छाप'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर देशातील विद्यार्थी आंदोलनाला नवे राजकीय वळण मिळाले असून, या संपूर्ण घडामोडीत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बजावलेली भूमिका चर्चेचा विषय ठरली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत केंद्र सरकारवर दबाव वाढविण्यात राहुल गांधी आणि काँग्रेसची भूमिका महत्त्वाची ठरल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

प्रश्नपत्रिका गळती, परीक्षा व्यवस्थेतील कथित त्रुटी आणि शिक्षण व्यवस्थेवरील प्रश्नांमुळे देशभरात विद्यार्थ्यांमध्ये असंतोष वाढत असताना राहुल गांधी यांनी हा मुद्दा सातत्याने संसदेत, पत्रकार परिषदांमधून आणि सार्वजनिक सभांमध्ये मांडला. युवक काँग्रेस आणि एनएसयूआयच्या माध्यमातून विविध राज्यांत निदर्शने करण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रश्न राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आला.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर राहुल गांधी यांनी प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओ संदेशात, हा निर्णय शिक्षण व्यवस्थेच्या पुनर्बांधणीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचे म्हटले. तसेच विद्यार्थ्यांनी शांततापूर्ण आणि घटनात्मक मार्गाने लढा दिल्याबद्दल त्यांचे कौतुक करत, आम्हाला तुमचा अभिमान आहे, असा संदेश दिला. त्याचबरोबर त्यांनी केंद्र सरकारवर टीका करत, आता या सरकारला हटविण्याची वेळ आली आहे, असे वक्तव्य केले.

राजकीय निरीक्षकांच्या मते, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला राष्ट्रीय स्वरूप मिळवून देण्यात राहुल गांधींची भूमिका महत्त्वाची होती. संसदेत सातत्याने प्रश्न उपस्थित करणे, विद्यार्थ्यांशी संवाद साधणे आणि त्यांच्या मागण्यांना राजकीय व्यासपीठ मिळवून देणे, या माध्यमातून विरोधकांनी सरकारवरील दबाव कायम ठेवला.



मात्र या संपूर्ण संघर्षाचा केंद्रबिंदू विद्यार्थीच होते. सुरुवातीला कोणत्याही पक्षाच्या झेंड्याखाली नव्हे, तर शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा आणि उत्तरदायित्वाच्या मागणीसाठी विद्यार्थी रस्त्यावर उतरले. त्यानंतर विविध विरोधी पक्षांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यामुळे या राजकीय घडामोडीचे श्रेय केवळ एका पक्षाला किंवा नेत्याला देता येणार नाही; विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण संघर्ष हा त्याचा प्रमुख आधार होता.

लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे काम केवळ सरकारवर टीका करणे नसते, तर जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडणेही असते. या दृष्टिकोनातून राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने भूमिका घेतली, असे काँग्रेसचे म्हणणे आहे. दुसरीकडे, सत्ताधारी पक्षाने या आरोपांना वेळोवेळी फेटाळले असून, शिक्षण क्षेत्रातील सुधारणा सुरू असल्याचा दावा केला आहे.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता लक्ष शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांकडे लागले आहे. परीक्षा प्रक्रिया अधिक सुरक्षित करणे, पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर यंत्रणा उभारणे, भरती प्रक्रिया पारदर्शक करणे आणि विद्यार्थ्यांचा विश्वास पुनर्स्थापित करणे, ही आगामी काळातील खरी आव्हाने असतील.

## संपादकीय

### एका राजीनाम्यासाठी एक महिना विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरवणं खरंच

लोकशाहीत जनतेचा आवाज महत्त्वाचा असतो, पण तो ऐकवण्यासाठी विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरावे लागणे ही कोणत्याही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे. शिक्षण व्यवस्था, परीक्षा प्रक्रिया आणि तरुणांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर सरकारने वेळेवर आणि पारदर्शक भूमिका घेणे अपेक्षित असते. कारण या विषयांचा संबंध केवळ राजकारणाशी नसून देशाच्या भावी पिढीशी असतो.

अलीकडील विद्यार्थी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पद सोडल्याची घटना अनेक प्रश्न उपस्थित करते. जर अखेरीस असा निर्णय घ्यावाच लागणार होता, तर तो इतक्या विलंबाने का झाला? हा प्रश्न केवळ विरोधकांचा नाही, तर लाखो विद्यार्थी, पालक आणि समाजाचाही आहे.

या काळात विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका गळती, परीक्षांतील कथित अनियमितता, प्रवेश प्रक्रियेतील अडचणी आणि भरती प्रक्रियेतील विलंब याविरोधात आवाज उठवला. अनेक शहरांत आंदोलन झाले. काही ठिकाणी पोलिसांशी संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. विद्यार्थ्यांचा अभ्यास, स्पर्धा परीक्षांची तयारी आणि मानसिक स्वास्थ्य यावर त्याचा परिणाम झाला.

दरम्यान, काँग्रेससह विविध विरोधी पक्षांनी हा मुद्दा संसदेत आणि रस्त्यावर सातत्याने उपस्थित केला. त्यामुळे सरकारवर राजकीय दबाव वाढला. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू राहिले; मात्र या संघर्षात सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांनाच बसला. राजकीय श्रेय कोणाला मिळाले, हा वेगळा मुद्दा असला तरी आंदोलनाचा केंद्रबिंदू विद्यार्थ्यांचे प्रश्न हेच होते.

लोकशाहीमध्ये आंदोलन हा घटनात्मक अधिकार आहे. इतिहास साक्षी आहे की अनेक महत्त्वाचे निर्णय जनतेच्या सातत्यपूर्ण दबावानंतरच झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपला आवाज उठवला, याला लोकशाहीच्या चौकटीत महत्त्व आहे. मात्र, आदर्श परिस्थितीत विद्यार्थ्यांना अभ्यास सोडून आंदोलन करावे लागू नये, ही जबाबदारी शासन आणि प्रशासनाची असते.

याच प्रकरणाने आणखी एक महत्त्वाचा प्रश्न समोर आणला आहे. एका व्यक्तीच्या राजीनाम्याने व्यवस्था बदलते का? उत्तर स्पष्टपणे नाही असेच आहे. परीक्षा प्रक्रिया अधिक सुरक्षित होणार का, पेपरफुटी रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी राहणार का, भरती प्रक्रिया पारदर्शक होणार का आणि विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा निर्माण होणार काया प्रश्नांची उत्तरे धोरणात्मक सुधारणांमध्ये आहेत, केवळ नेतृत्वबदलात नाहीत.

कोणतेही सरकार असो, वेळेवर संवाद साधणे, जबाबदारी स्वीकारणे आणि आवश्यक निर्णय घेणे ही चांगल्या प्रशासनाची लक्षणे मानली जातात. विलंबामुळे निर्माण होणारा अविश्वास अनेकदा परिस्थिती अधिक चिघळवतो. त्यामुळे अशा घटनांमधून शासनाने संवादकेंद्रित आणि उत्तरदायी प्रशासनाचा धडा घेणे आवश्यक आहे.

या संपूर्ण प्रकरणाकडे राजकीय विजय किंवा पराभव म्हणून पाहण्यापेक्षा, विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. कारण देशाचे भविष्य घडवणाऱ्या तरुणांना त्यांच्या शिक्षणापेक्षा आंदोलनाला प्राधान्य द्यावे लागणे, ही कोणत्याही समाजासाठी अभिमानाची बाब ठरू शकत नाही.

शेवटी प्रश्न तोच राहतो विद्यार्थ्यांच्या आवाजाकडे वेळेवर लक्ष दिले असते, तर एवढ्या मोठ्या आंदोलनाची गरज पडली असती का? या प्रश्नाचे उत्तर केवळ एका सरकारने नव्हे, तर भविष्यातील प्रत्येक प्रशासनाने शोधण्याची गरज आहे. कारण लोकशाहीची खरी ताकद जनतेचा आवाज ऐकण्यात आहे; तो रस्त्यावर उतरल्यावर ऐकण्यात नव्हे.

# मोबाईलपासून दूर राहून १२ तास, १२ महिने क्लासशिवाय अभ्यास; हेच माझ्या यशाचे रहस्य' : यूपीएससीतील १२५ वे रँकधारक कबीर कांबळे

### अमित गोरखे यूथ फाउंडेशनच्या गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात प्रेरणादायी मार्गदर्शन; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि शिष्यवृत्ती वितरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि कै. गणपत गोरखे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अमित गोरखे यूथ फाउंडेशनच्या वतीने आयोजित 'गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा-२०२६' उत्साहात पार पडला. नोवेल स्कूल येथे झालेल्या या कार्यक्रमात दहावी व बारावीमध्ये उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच *'कै. गणपत गोरखे शिष्यवृत्ती'*चेही वितरण करण्यात आले.

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते यूपीएससी परीक्षेत देशात १२५ वा क्रमांक मिळवणारे कबीर कांबळे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन. अत्यंत कठीण परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या यशामागील संघर्ष विद्यार्थ्यांसमोर उलगडताना त्यांनी सातत्यपूर्ण स्व-अभ्यास आणि जिद्द हाच यशाचा मंत्र असल्याचे सांगितले.

**'अपयशाला घाबरू नका; सातत्य ठेवा'**

कबीर कांबळे म्हणाले, यूपीएससीसारख्या कठीण परीक्षेत एक टक्क्यांपेक्षाही कमी उमेदवार यशस्वी होतात. पदवी शिक्षणानंतर मलाही अनेकदा अपयश आले. मात्र, माझ्या आई-वडिलांनी आणि भावाने प्रत्येक अपयशानंतर मला धीर दिला. त्याच पाठबळामुळे मी पुन्हा उभा राहिलो.

मोबाईलपासून दूर राहून, कोणत्याही क्लासशिवाय सलग १२ महिने दररोज १२ तास अभ्यास केला. हेच माझ्या यशाचे खरे रहस्य आहे. सोशल मीडियाचा वापर केवळ गरजेपुरताच केला, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना अपयशाने खचून न जाता सातत्याने प्रयत्न करण्याचा सल्ला दिला.

**'योग्य आदर्श ठेवा, यश तुमचेच' – आमदार अमित गोरखे**

कार्यक्रमात आमदार अमित गोरखे म्हणाले की, राजकारण म्हणजे केवळ हार-तुरे स्वीकारणे नाही, तर समाजासाठी काम करण्याची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी आयुष्यात योग्य आदर्श निवडले, तर यश निश्चित मिळते. आज व्यासपीठावर उपस्थित प्रत्येक मान्यवर तरुणांसाठी प्रेरणास्थान आहे.

**'मुलांना अपयश स्वीकारण्याचे स्वातंत्र्य द्या' – विक्रांत बागडे**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बागडे यांनी पालकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मुलांना अपयश स्वीकारण्याचे आणि स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. त्यांच्याशी सातत्याने संवाद ठेवणे आवश्यक आहे. रस्ता पुन्हा बांधता येतो, पण शिक्षणात झालेली चूक संपूर्ण पिढीवर परिणाम करू शकते.

**मान्यवरांची उपस्थिती**

या कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त विक्रांत बागडे, यूपीएससीतील यशस्वी उमेदवार कबीर कांबळे, उपमहापौर शर्मिला बाबर, तुषार हिंगे, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, कुशाग्र कदम, नेताजी शिंदे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करत त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारा हा उपक्रम सलग सातव्या वर्षी यशस्वीपणे पार पडला असून, उपस्थित विद्यार्थ्यांना कबीर कांबळे यांच्या प्रेरणादायी प्रवासातून नवी ऊर्जा आणि आत्मविश्वास मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये शेतकरी महिलांचा सन्मान

### भाजप महिला मोर्चातर्फे 'महिला कृषी सन्मान सोहळा'; २०० हून अधिक शेतकरी महिलांचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र (देवाभाऊ) फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने पिंपरी-चिंचवडमध्ये 'महिला कृषी सन्मान सोहळा' उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात शेती क्षेत्रात योगदान देणाऱ्या २०० हून अधिक शेतकरी महिलांचा पारंपरिक पद्धतीने सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात शेतकरी महिलांची ओटी भरून, पुष्पगुच्छ देऊन आणि सन्मानचिन्ह प्रदान करून गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित महिलांनी देवाभाऊ, धन्यवाद! अशा घोषणा देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना विधान परिषदेच्या आमदार उमाताई खापरे यांनी महिलांच्या सामाजिक, कौटुंबिक आणि कृषी क्षेत्रातील योगदानाचा गौरव केला.

त्या म्हणाल्या, महिलांनी शेतीसह प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महिलांसाठी राबविण्यात आलेल्या विविध कल्याणकारी योजनांमुळे महिलांना आर्थिक बळ, आत्मविश्वास आणि सामाजिक स्थैर्य मिळाले आहे. महिला सक्षमीकरणासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे.

या सोहळ्यात शेतकरी महिलांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. उपस्थित महिलांनीही अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील महिलांना प्रेरणा मिळत असल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाला भाजप महिला मोर्चाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्या तसेच शेतकरी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## मोशी डेपोचा ताण कमी करण्यासाठी पर्यायी जागांचा शोध; पालिकेच्या हालचालींना वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपोवरील वाढता ताण कमी करून शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने पर्यायी वेस्ट प्रोसेसिंग प्लांट उभारण्याच्या दृष्टीने हालचाली वेगाने सुरू केल्या आहेत. यासाठी शहरातील विविध संभाव्य जागांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.



भाजप 'क' प्रभाग (विजयदुर्ग) अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे यांच्या पुढाकाराने हा पाहणी दौरा पार पडला. शहराचा वाढता विस्तार, लोकसंख्येतील वाढ आणि निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वाढते प्रमाण लक्षात घेता मोशी डेपोवरील भार कमी करण्यासाठी कचरा प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्यावर महापालिकेचा भर आहे. या अनुषंगाने गवळीमाथा परिसर, पिंपरी परिसर तसेच संरक्षण विभागाच्या ताब्यातील उपलब्ध जागांची पाहणी करण्यात आली. या जागांवर आधुनिक वेस्ट प्रोसेसिंग प्लांट उभारण्याची शक्यता तपासण्यात आली.

पाहणी दौऱ्यात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, 'क' प्रभागाचे क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, सहायक आरोग्य अधिकारी श्री. फल्ले व सुनील नरोटे, तसेच वेस्ट प्रोसेसिंग प्लांट उभारणीशी संबंधित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी विविध जागांची पाहणी करून तांत्रिक बाबींचा आढावा घेतला.

दरम्यान, संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील जागा उपलब्ध करून घेण्यासाठी सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रस्तावाला गती देण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे विशेष पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

मोशी कचरा डेपोवरील ताण कमी करण्यासाठी पर्यायी प्रक्रिया केंद्रे उभारण्यात यश आल्यास शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होण्यास मदत होणार असून, भविष्यातील कचरा व्यवस्थापनासाठीही हा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या भक्तिनिवासाचे भूमिपूजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पंढरपूर ।। प्रतिनिधी**

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या नव्या भक्तिनिवासाच्या उभारणीस आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन करून शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाथ चौक येथील श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेऊन विधीवत पूजा केली.

भक्तांच्या सोयीसाठी उभारण्यात येणाऱ्या या भक्तिनिवासाच्या भूमिपूजन सोहळ्यास पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार बापूसाहेब पठारे, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त योगी निरंजननाथ गुरु शांतीनाथ, पालखी सोहळा प्रमुख तथा विश्वस्त राजेंद्र उमाप, विश्वस्त चैतन्य लोंढे, डॉ. रोहिणी पवार आणि पुरुषोत्तम पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांचा श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. नवीन भक्तिनिवासामुळे पंढरपूरला येणाऱ्या वारकरी आणि भाविकांना अधिक चांगल्या निवास सुविधा उपलब्ध होणार असून, संस्थानच्या सेवाकार्यातही महत्त्वाची भर पडणार असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

## विठूनामाच्या गजरात दुमदुमली अभंग इंग्लिश मिडीयम स्कूलची बालवारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**देहू। प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने श्रीक्षेत्र देहू येथील सृजन फाऊंडेशन संचलित अभंग इंग्लिश मिडीयम स्कूल येथे पारंपरिक अभंग वारीचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या वारीत नर्सरी, एलकेजी, यूकेजी तसेच इयत्ता पहिली, दुसरी आणि तिसरीतील विद्यार्थ्यांनी मोठ्या भक्तिभावाने सहभाग नोंदविला.

बालवारकऱ्यांनी भगवान विठ्ठल, माता रुक्मिणी तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव, संत मुक्ताबाई आणि संत एकनाथ यांचे वेष परिधान करून वारीची परंपरा जिवंत केली. टाळ-मृदुंगाच्या गजरात, ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात आणि विठूनामाच्या अखंड गजरात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

पूर्व प्राथमिक विभागातील चिमुकल्यांनी टाळांच्या तालावर फुगड्यांचा फेर धरत विठ्ठलनामात रंग भरला, तर प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी संतांच्या दिंड्या, पालखी सोहळा आणि रिंगण साकारून वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा अनुभवली. आम्ही पालखीचे भोई म्हणत विद्यार्थ्यांनी पालखी खांद्यावर घेत भक्तीचा अनोखा आविष्कार घडविला. काही विद्यार्थ्यांनी सुमधुर अभंग सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# निघोजेत भरधाव टेम्पोचा थरार; बलेनो कार व रिक्षाला धडक, पाच जण जखमी

### राँग साईडने येत अपघात घडवून चालक फरार; दक्षिण म्हाळुंगे पोलिसांत गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**निघोजे । प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील निघोजे परिसरात भरधाव आणि बेदरकार टेम्पो चालकाने राँग साईडने येत बलेनो कार आणि प्रवासी रिक्षाला जोरदार धडक दिल्याने पाच जण जखमी झाले. अपघातानंतर टेम्पो चालक घटनास्थळावरून फरार झाला असून, त्याच्याविरुद्ध दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना शुक्रवारी (दि. २४) दुपारी सुमारे साडेचार वाजण्याच्या सुमारास स्पायसर चौक ते डोंगरवस्ती रस्त्यावरील रेडिओव्हर श्रद्धा कंपनीसमोर घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एमएच १२ ईएफ ६५६६ क्रमांकाचा टेम्पो भरधाव वेगात आणि चुकीच्या बाजूने येत होता. यावेळी समोरून येणाऱ्या एमएच १४ एमएल ४४४६ क्रमांकाच्या बलेनो कारला तसेच तिच्या मागे असलेल्या एमएच १४ एलएस ८१४५ क्रमांकाच्या प्रवासी रिक्षाला टेम्पोने जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात कार आणि रिक्षाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. दर्शन संदीप येळवंडे (वय २०) यांच्या कपाळाला गंभीर दुखापत झाली असून, अनिकेत भाऊसाहेब येळवंडे यांच्या छातीला गंभीर मार लागला आहे. शरवरी अनिकेत येळवंडे यांच्या उजव्या हाताला दुखापत झाली आहे. तसेच सुनील बाळाराम महापुळकर (वय ५३, रा. मंजाबा वस्ती, पुणे) आणि आणखी एक प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. सर्व जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघात घडवल्यानंतर टेम्पो चालकाने घटनास्थळावरून पळ काढला. जखमी दर्शन येळवंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दक्षिण म्हाळुंगे पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(२) तसेच मोटार वाहन कायद्यातील कलम १४८, १३४(अ) आणि १३४(ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुपेकर करीत आहेत.

**चिखलीतून ३५ हजारांची रॉयल एनफिल्ड बुलेट चोरीला**

ठिकाण: मोरेवस्ती, सानेचौक, चिखली । पोलीस ठाणे: चिखली

घटना: मोरया हाऊसिंग सोसायटीत राहणारे तक्रारदार वेदांत पाटील यांची ३५,००० रुपये किमतीची ग्रे रंगाची 'रॉयल एनफिल्ड बुलेट' (चक ४३ इढ ०८१४) अज्ञात चोरट्याने रात्रीच्या सुमारास चोरून नेली.

कारवाई: बी.एन.एस. कलम ३०३(२) अन्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल. तपासी अधिकारी: पोहवा माने (९०२१७६४३५३)

**पुनावळेत जुन्या पडक्या वाड्यात जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; ४ जण निष्पन्न**

ठिकाण: बोरगेवाडा, जुना पडका वाडा, पुनावळे गावठाण । पोलीस ठाणे: रावेत

घटना: रावेत पोलीस ठाण्याच्या अंमलदारांनी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पुनावळे येथील एका जुन्या पडक्या वाड्यात सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकली. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी 'फ्लॅश' नावाचा जुगार खेळताना ५२ पत्ते आणि ९८०/- रुपयांच्या रोख रक्कमेसह आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

नमुद आरोपी: सिद्धराम निरगुडे (वय २२), सुबोध ढोले (वय ५०), पांडुरंग भुजबळ (वय ४३) आणि किरण रोकडे (वय ३५).

कारवाई: महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल.

तपासी अधिकारी: सपोफौज कोळगे (९९२११०३०८८)

**सुरक्षेच्या उपायांशिवाय काम करताना मजुराचा उंचावरून पडून मृत्यू; कंपनी मालकावर गुन्हा**

ठिकाण: शुभम उद्योग, जे ब्लॉक, एमआयडीसी भोसरी । पोलीस ठाणे: एम.आय.डी.सी भोसरी

घटना: कंपनीमध्ये कामगारांच्या सुरक्षेची कोणतीही उपाययोजना न केल्याने, पतंग पत्रे बसवण्याचे काम करणारा मजूर मोहम्मद सय्यद शाहोराव (वय २५) हा छतावरून खाली लॉंड्री पाईपवर पडल्याने त्याचा गंभीर दुखापत होऊन मृत्यू झाला. निष्काळजीपणामुळे निष्पाप मजुराचा जीव गेल्याने कंपनी मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाई: भारतीय न्याय संहिता कलम १०६(१) अन्वये गुन्हा दाखल. आरोपी: समीर विजयकुमार भट (रा. धनकवडी).

तपासी अधिकारी: सपोनि खोसे (९८८१९३१३५३

## ह.भ.प. किसन महाराज चौधरी, जयंत उर्फ आप्पा बागल आणि शिल्पा धर्माधिकारी 'संत सेवक' पुरस्काराने सन्मानित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने अनुप मोरे सोशल अँड स्पोर्ट्स फाउंडेशन आणि संस्कृती संवर्धन व विकास महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'बोलावा विठ्ठल' या भक्तिगीतांच्या कार्यक्रमाला विठ्ठलभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग. दि. माडगूळकर सभागृहात पार पडलेल्या या भक्तिमय सोहळ्यात विठ्ठल नामाच्या गजरात अभंग, भक्तिगीते आणि अध्यात्माचा सुरेल संगम अनुभवायला मिळाला.

याचवेळी समाजसेवा, अध्यात्म, शिक्षण आणि संस्कार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा 'संत सेवक पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी ह.भ.प. किसन महाराज पांडुरंग चौधरी, ह.भ.प. जयंत उर्फ आप्पा नेमाडे बागल आणि ह.भ.प. सौ. शिल्पा दीपक धर्माधिकारी यांना 'संत सेवक पुरस्कार' प्रदान करून त्यांच्या समाजप्रबोधन, वारकरी परंपरेचा प्रचार-प्रसार आणि मानवसेवेतील योगदानाचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात पुरस्कारार्थींचा सन्मान केला. कार्यक्रमाला वारकरी संप्रदायातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक आणि विठ्ठलभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक व संगीतकार कुमार करंदीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत विठ्ठलभक्तीने ओतप्रोत भरलेले अभंग सादर करण्यात आले. त्यांच्यासोबत श्रुती करंदीकर, सौरभ दफ्तरदार, वैदेही करंबेळकर, इंद्रायणी महाजन, अंकिता पांडेराणे आणि ओंकार पाटणकर यांनी आपल्या सादरीकरणातून संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊ घातले.

भाजप युवा मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे म्हणाले, आषाढी एकादशी हा केवळ धार्मिक उत्सव नसून संतांच्या विचारातून समाजाला सेवा, समता आणि मानवतेचा संदेश देणारा पवित्र दिवस आहे. समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान व्हावा, त्यांच्या कार्यातून नव्या पिढीला प्रेरणा मिळावी आणि वारकरी परंपरेतील संस्कार अधिक दृढ व्हावेत, या उद्देशाने 'संत सेवक पुरस्कार' सुरू करण्यात आला आहे. भविष्यातही अशा सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे सातत्य राखले जाईल.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# धनगरधरा तलाव ८० टक्के भरला; शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील धामणी परिसरात गेल्या चार ते पाच दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे येथील धनगरधरा तलाव ८० टक्के भरला असून, त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जुलैच्या पहिल्या आठवड्यात पावसाने दमदार सुरुवात केली. त्यानंतर काही दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा झालेल्या मुसळधार पावसामुळे धामणी गावाच्या दक्षिणेला असलेल्या धनगरधरा तलावाच्या पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी हा तलाव जून महिन्यातच पूर्ण क्षमतेने भरला होता. यंदा पावसाने उशिरा हजेरी लावली असली तरी झालेल्या जोरदार पावसामुळे तलाव सध्या ८० टक्के भरला आहे.

या तलावातील पाण्याचा रोडेमळा, माळीमळा, मधला जाधव मळा, द्रौणागिरी तसेच परिसरातील इतर शेती क्षेत्रांना मोठा लाभ होत असल्याची माहिती स्थानिक शेतकरी



रुपेश जाधव यांनी दिली. तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यास एप्रिल अखेरपर्यंत सिंचनासाठी पाणी उपलब्ध राहते, त्यामुळे खरीपाबरोबरच रब्बी हंगामालाही मोठा आधार मिळतो, असेही त्यांनी सांगितले.

यंदाच्या पावसामुळे धनगरधरा तलावातील पाणीसाठा समाधानकारक वाढल्याने आगामी हंगामासाठी पाण्याची चिंता काही प्रमाणात कमी झाली असून, शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा एकदा पल्लवित झाल्या आहेत.

## सारांश वृत्त

### अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पुणे महापालिकेच्या 'स्वच्छता अभियान सप्ताह'चा बोपोडीत शुभारंभ



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पुणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'स्वच्छता अभियान सप्ताह' उपक्रमाचा औंध क्षेत्रीय कार्यालयामार्फत बोपोडी येथे उत्साहात शुभारंभ करण्यात आला.

शनिवारी सकाळी ७ वाजता झालेल्या कार्यक्रमात पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभियानाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी प्रभाग समिती अध्यक्षा रोहिणी चिमटे, सभासद बाबुराव चांदेरे, अमोल बालवडकर, सनी निम्हण, भक्ती गायकवाड तसेच औंध क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त विजय नायकल, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभियानाच्या शुभारंभानंतर लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वतः झाडू हाती घेत परिसराची स्वच्छता केली. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे, असा संदेश देत शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

पुणे महानगरपालिकेच्या 'स्वच्छता अभियान सप्ताह' अंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छता मोहीम, पर्यावरण संवर्धन, जनजागृती आणि नागरिक सहभागावर आधारित विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या अभियानात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, यासाठी महापालिकेकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त धामणी खिंड येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात भाविकांची मोठी गर्दी

**महाप्रसादाचे आयोजन; धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून मंदिराचा विकास करण्याची ग्रामस्थांची मागणी**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त आंबेगाव तालुक्यातील धामणी खिंड येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली. जारकरवाडी, ज्ञानेश्वर वस्ती-बढेकरमळा, लोणी, धामणी, पहाडदरा, शिरदाळे, खडकवाडी आदी गावांतील शेकडो भाविकांनी मंदिरात दर्शन घेऊन विठ्ठल-रखुमाई आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक झाले.

धामणी खिंड येथील या मंदिरात संत ज्ञानेश्वर महाराज तसेच विठ्ठल-रुक्मिणी यांच्या मूर्ती आहेत. प्रत्येक महिन्याच्या एकादशीला तसेच आषाढी आणि कार्तिकी एकादशीनिमित्त आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील नागरिक मोठ्या



संख्येने येथे दर्शनासाठी येतात.

स्थानिक भाविकांच्या श्रद्धेनुसार, संत ज्ञानेश्वर महाराज आळे (ता. जुन्नर) येथून आळंदीकडे जात असताना धामणी खिंड येथे विश्रांतीसाठी थांबले होते. या श्रद्धेतून धामणी, जारकरवाडी आणि ज्ञानेश्वर वस्ती-बढेकरमळा येथील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून भव्य मंदिर उभारले आहे. तसेच माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून मंदिरासमोर दोन्ही बाजूंना प्रशस्त सभामंडप उभारण्यात आले आहेत.

डोंगररांगांच्या कुशीत व निसर्गरम्य परिसरात वसलेले हे मंदिर आज या भागातील महत्त्वाचे धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. शासनाने या परिसराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिल्यास हे मंदिर राज्यातील प्रमुख धार्मिक पर्यटन केंद्रांपैकी एक ठरू शकते, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

आषाढी एकादशीनिमित्त मंदिरात आलेल्या भाविकांसाठी खिचडीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे नियोजन ज्ञानेश्वर वस्ती-बढेकरमळा, जारकरवाडी आणि धामणी येथील ग्रामस्थांनी केले. संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या गजराने आणि भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

# अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; ५० जणांचे स्वेच्छेने रक्तदान

**विद्यार्थी, शिक्षक, माजी विद्यार्थी व नागरिकांचा सहभाग; समाजसेवेचा प्रेरणादायी उपक्रम**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर । प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि चाकण ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात विद्यार्थी, माजी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी तसेच नागरिकांनी सहभाग घेत ५० जणांनी स्वेच्छेने रक्तदान केले.

शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एस. गायकवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत, एका रक्तदात्यामुळे



अनेक रुग्णांना नवजीवन मिळू शकते, असे सांगितले. प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित रक्तदान करून समाजसेवेत आपले योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. तसेच शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक करत रक्तदात्यांचे अभिनंदन केले.

शिबिरात चाकण ब्लड बँकेच्या वैद्यकीय पथकाने सुरक्षित व नियोजनबद्ध पद्धतीने रक्तसंकलनाची प्रक्रिया पूर्ण केली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना रुजविणे, रक्तदानाबाबत जनजागृती करणे आणि गरजू रुग्णांसाठी रक्ताचा साठा उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

महाविद्यालयात दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या रक्तदान शिबिराला विद्यार्थी आणि नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याने हा उपक्रम आता महाविद्यालयाची समाजोपयोगी परंपरा बनला आहे. रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यात युवकांचा वाढता सहभाग समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी उपप्राचार्य प्रा. सुनील साळके, डॉ. शाम मिसाळ, डॉ. सपना पाटील, डॉ. सुनील पानसरे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी आणि विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रमेश गावडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर टेकाळे यांनी केले, तर डॉ. एस. एस. उघडे यांनी आभार मानले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विभाग, स्वयंसेवक, शिक्षक, कर्मचारी तसेच सहकार्य करणाऱ्या संस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# आंबेगाव तालुक्यात २७ जुलै रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' अंतर्गत भव्य समाधान शिबिर

**एकाच छताखाली महसूल, कृषी, आरोग्य, रेशन, मतदार नोंदणीसह १० प्रमुख शासकीय सेवांचा लाभ**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' अंतर्गत आंबेगाव तालुकास्तरीय भव्य समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सोमवार, दि. २७ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शिवगिरी मंगल कार्यालय, मंचर (ता. आंबेगाव, जि. पुणे) येथे होणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी अर्चना तांबे यांनी दिली.

महसूल व वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे आणि आंबेगाव तालुक्यातील विविध शासकीय विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे उद्घाटन आमदार तथा माजी सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील यांच्या हस्ते होणार असून, खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अपर जिल्हाधिकारी सतीश राजहंस, उपविभागीय अधिकारी अर्चना तांबे तसेच तहसीलदार राहुल सारंग यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविणे आणि विविध विभागांच्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

प्रशासनाने नागरिकांना आवश्यक कागदपत्रांसह मोठ्या संख्येने शिबिरात उपस्थित राहून विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. एकाच ठिकाणी अनेक विभागांच्या सेवा उपलब्ध होत असल्याने नागरिकांचा वेळ, श्रम आणि खर्च वाचणार असून, शासनाच्या योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

**या सेवा मिळणार एकाच ठिकाणी**

* शिबिरामध्ये नागरिकांना सुमारे दहा प्रमुख विभागांच्या विविध सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.
* **महसूल विभाग** : उत्पन्न, जात, नॉन-क्रीमीलेयर, अधिवास (डोमिसाईल) व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र.
* **पुरवठा विभाग** : नवीन रेशन कार्ड, नाव समाविष्ट/वगळणे, 'एक देश-एक शिधापत्रिका' योजना.
* **संजय गांधी योजना विभाग** : निराधार, श्रावणबाळ वृद्धापकाळ निवृत्तीवेतन व इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन.
* **जमीन महसूल विभाग** : एमएलआरसी कलम ८५(२) अंतर्गत संमतीने वाटणी, ७/१२ उतारा, शेतकरी दाखले, एनए प्रमाणपत्र.
* **निवडणूक विभाग** : नवीन मतदार नोंदणी, नाव, पत्ता व फोटो दुरुस्ती तसेच मतदार यादी शुद्धीकरण.
* **कृषी व फलोत्पादन विभाग** : महाडीबीटी, ट्रॅक्टर व अवजार अनुदान, ठिबक व तुषार सिंचन, शेततळे योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजना.
* **आरोग्य विभाग** : आयुष्मान भारत कार्ड, अइक्ऊ डिजिटल हेल्थ आयडी, जननी सुरक्षा योजना.
* **दुग्ध व पशुसंवर्धन विभाग** : मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना, दूधाळ जनावरे, शेळी-मेंढी वाटप, कडबाकुट्टी यंत्र अनुदान.

# आषाढी एकादशीनिमित्त थोरल्या पादुका मंदिरात पांडुरंगरायांची महापूजा; हरिनामाने परिसर दुमदुमला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी । प्रतिनिधी**

देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त आळंदीजवळील वडमुखवाडी येथील माऊलींचे विसाव्याचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिरात ट्रस्टच्या वतीने पांडुरंगरायांची महापूजा भक्तिभावात आणि हरिनामाच्या गजरात संपन्न झाली.

यावेळी श्री पांडुरंग, रुक्मिणी माता आणि श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या मूर्तींना दही, दूध, मध आणि अत्तराने अभिषेक करण्यात आला. त्यानंतर पुष्पहार अर्पण करून विधिवत महापूजा व आरती करण्यात आली. मंदिराचे संस्थापक अध्यक्ष ॲड. विष्णू तापकीर, ॲड. मयूर तापकीर, सुनिता तापकीर, कीर्ती तापकीर तसेच समस्त तापकीर परिवाराच्या हस्ते महापूजा संपन्न झाली. महापूजेनंतर हरिनामाच्या गजरात श्रींना फराळाचा महानैवेद्य अर्पण करण्यात आला. यावेळी मंगेश गराडे, राजेंद्र नाणेकर, साहेबराव काशीद, शिवाजी तळेकर, देविदास पठारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आषाढी एकादशीनिमित्त मंदिरात पहाटे काकडा, भजन, त्यानंतर सकाळी हभप सुभाष महाराज लबडे यांच्या कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले. दुपारच्या सत्रात महिलांच्या भजन सेवेने भक्तिमय वातावरण अधिकच खुलून आले. हरिजागरासह विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले.

दिवसभर मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने रांगा लावल्या होत्या. मंदिर परिसर आकर्षक रांगोळीने सजविण्यात आला होता. तसेच ॲड. विष्णू तापकीर यांच्या वतीने उपस्थित भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या अखंड गजराने आणि भक्तिरसाने भारावून गेला.

# पुणे जिल्हा बँकेची 'अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजना' सुरू; एआय आधारित शेतीसाठी १,००० कोटींचा निधी

## 'शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, हेच अजितदादांचे स्वप्न'; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त 'अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजना' सुरू करण्यात आली. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित आधुनिक शेतीसाठी शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या या महत्त्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या की, महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, हेच दिवंगत अजितदादा पवार यांचे स्वप्न होते. शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढवून उत्पादनवाढ आणि शाश्वत शेतीला चालना देण्याचा त्यांचा ध्यास होता. पुणे जिल्हा बँकेच्या या योजनेमुळे त्यांचे स्वप्न साकार होण्यास निश्चितच मदत होईल.

या कार्यक्रमानिमित्त शेतकरी मेळावा, आदर्श शेतकरी सन्मान सोहळा तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बँकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रेय भरणे, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार शंकर मांडेकर, जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

**एआयच्या मदतीने आधुनिक शेतीला चालना**

या योजनेसाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने १,००० कोटींची तरतूद केली असून, विशेषतः ऊस शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. या तंत्रज्ञानामुळे ऊस उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत वाढ, ३० टक्के पाण्याची बचत आणि रासायनिक खतांचा वापर कमी होऊन जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले. बारामतीमध्ये या तंत्रज्ञानाचा यशस्वी प्रयोग झाल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

**कर्जमाफीच्या लाभार्थ्यांनाही प्रमाणपत्रांचे वितरण**

कार्यक्रमात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना प्रतीकात्मक लाभ वितरण करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील ६१ हजार ९०० शेतकऱ्यांना ५२३.२२ कोटींच्या कर्जमाफीचा लाभ दिला जाणार असून, ही पहिली यादी २ लाखांपर्यंत थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांची असल्याची माहिती देण्यात आली.

सुनेत्रा पवार यांनी सांगितले की, राज्य सरकारच्या कर्जमुक्ती योजनेमुळे राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ४० हजार कोटींपेक्षा अधिक मदत मिळणार असून, पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनाही सुमारे २ हजार कोटींचा लाभ मिळणार आहे.

**'सहकारातून ग्रामीण विकासाला चालना'**

कृषी मंत्री दत्तात्रेय भरणे यांनी राज्य सरकारच्या शेतकरी हिताच्या विविध योजनांची माहिती देत यांत्रिकीकरण, मुख्यमंत्री पाणंद रस्ते, सौरऊर्जा आणि वीजबिल माफीसारख्या उपक्रमांमुळे शेती अधिक सक्षम होत असल्याचे सांगितले.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी, अजितदादा पवार कृषी समृद्धी कर्ज योजना ही शेतकऱ्यांच्या स्वप्नांना बळ देणारी, आधुनिक तंत्रज्ञानाशी शेतीची सांगड घालणारी आणि सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारी योजना आहे, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी योजनेची सविस्तर माहिती देत, एआयच्या माध्यमातून अचूक शेती, कीड व रोगांचे निदान, हवामानाचा अंदाज आणि हवामान बदलाशी सुसंगत शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना या योजनेचा मोठा फायदा होणार असल्याचे सांगितले.

## सारांश वृत्त

### 'माझी मुलगी परत येणार नाही, पण न्याय हवा!' – NEET विद्यार्थिनीच्या आत्महत्येनंतर पालकांची यायाची आर्त मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर । प्रतिनिधी**

NEET-UG 2026 परीक्षा प्रश्नपत्रिका लीक प्रकरणानंतर आत्महत्या केलेल्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या विद्यार्थिनीच्या पालकांनी सरकारकडे न्याय आणि नुकसानभरपाईची मागणी केली आहे. मुलीच्या मृत्यूनंतरही सरकारने त्यांच्या कुटुंबाची दखल घेतली नसल्याचा आरोप करत त्यांनी दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. मृत विद्यार्थिनी आकांक्षा चतुर्वेदी हिची आई नीलम चतुर्वेदी यांनी भावनिक शब्दांत सांगितले की, माझी मुलगी आता परत येणार नाही. केवळ राजीनाम्याने आम्हाला समाधान मिळणार नाही. आमच्या मुलीला न्याय मिळावा, आमच्या कुटुंबाला नुकसानभरपाई मिळावी आणि प्रश्नपत्रिका लीक करणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी. त्यांनी सरकारने त्यांच्या कुटुंबाशी कोणताही संपर्क साधला नसल्याचीही खंत व्यक्त केली. आकांक्षाचे वडील कृष्णकुमार चतुर्वेदी यांनी सांगितले की, मुलीचे डॉक्टर होऊन देशाची सेवा करण्याचे स्वप्न होते. तिच्या शिक्षणासाठी कुटुंबाने जमीन विकली होती. आमच्यासाठी आता मुलीपेक्षा मोठे काहीच नाही, असे ते म्हणाले.

### अमेरिकेचा भारतावर १०% अतिरिक्त आयात शुल्क; तरीही द्विपक्षीय व्यापार करारासाठी चर्चा सुरूच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

अमेरिकेने भारतासह ६० व्यापार भागीदार देशांवरील नव्या व्यापार धोरणांतर्गत भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर १० टक्के अतिरिक्त आयात शुल्क लागू केले असले, तरी भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार करारासाठी चर्चा सुरूच राहणार असल्याचे केंद्र सरकारने शनिवारी स्पष्ट केले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने सक्तीच्या मजुरीतून तयार होणाऱ्या वस्तूंच्या आयातीवर नियंत्रण ठेवण्यात संबंधित देश अपयशी ठरल्याचा आरोप करत १० ते १२.५ टक्क्यांपर्यंतचे नवीन आयात शुल्क जाहीर केले आहे. भारतावर लागू करण्यात आलेले १० टक्के शुल्क हे जूनमध्ये प्रस्तावित १२.५ टक्के शुल्कापेक्षा कमी आहे.

# भारताच्या पहिल्या हायड्रोजन रेल्वेचा १,२०० किमी प्रवास पूर्ण; ३,००० लिटर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जींद (हरियाणा) प्रतिनिधी**

भारतीय रेल्वेच्या हरित वाहतूक अभियानाला मोठे यश मिळाले असून, जींद–सोनीपत मार्गावरील भारताच्या पहिल्या हायड्रोजन इंधनावर चालणाऱ्या रेल्वेने १,२०० किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला आहे. या प्रवासादरम्यान पारंपरिक डिझेल इंजिनाऐवजी हायड्रोजन इंधनाचा वापर झाल्याने सुमारे ३,००० लिटर डिझेलची बचत झाली आणि धुराऐवजी केवळ पाण्याची वाफ उत्सर्जित झाली. हा प्रकल्प भारतीय रेल्वेच्या स्वच्छ आणि शून्य–उत्सर्जन वाहतुकीकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल मानला जात आहे.

१७ जुलै २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरू करण्यात आलेली ही हायड्रोजन रेल्वे हरियाणातील जींद–सोनीपत या मार्गावर धावत आहे.



रेल्वेमध्ये स्वदेशी विकसित हायड्रोजन फ्युएल सेल तंत्रज्ञान वापरण्यात आले असून, इंजिनातून कार्बनयुक्त धूर बाहेर पडत नाही. त्याऐवजी इंधन प्रक्रियेनंतर केवळ पाण्याची वाफ आणि उष्णता निर्माण होते, त्यामुळे ही रेल्वे पर्यावरणपूरक पर्याय म्हणून पाहिली जात आहे.

रेल्वे मंत्रालयाच्या माहितीनुसार, या तंत्रज्ञानामुळे जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार असून, भविष्यात भारतीय रेल्वेच्या कार्बन उत्सर्जनातही लक्षणीय घट होण्याची अपेक्षा आहे. सुरुवातीच्या काही दिवसांतच रेल्वेने शेकडो किलोमीटरचा यशस्वी प्रवास केल्यानंतर आता १,२०० किलोमीटरचा टप्पा पूर्ण केल्याने या प्रकल्पाच्या कार्यक्षमतेवर विश्वास अधिक दृढ झाला आहे.

भारतातील ही हायड्रोजन रेल्वे 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत विकसित करण्यात आली असून, भारताला जर्मनी, जपान आणि चीनसारख्या स्वच्छ ऊर्जा वापरणाऱ्या देशांच्या यादीत स्थान मिळवून देणारा हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. तज्ज्ञांच्या मते, या प्रकल्पाचे यश भविष्यात देशातील इतर रेल्वे मार्गांवरही हायड्रोजन तंत्रज्ञानाचा विस्तार करण्याचा मार्ग मोकळा करू शकते.

## 'समुद्र मंथन' मोहिमेला मोठी सुरुवात! महानदी सागरी खोऱ्यात ओएनजीसीची पहिली खोल समुद्री शोधविहीर खोदकामास प्रारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशाच्या ऊर्जा स्वावलंबनाकडे महत्त्वाचे पाऊल टाकत सार्वजनिक क्षेत्रातील तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळ (ओएनजीसी) ने महानदी सागरी खोऱ्यातील पहिल्या खोल समुद्री शोधविहिरीचे खोदकाम सुरू केले आहे. केंद्र सरकारच्या 'समुद्र मंथन' मोहिमेअंतर्गत एमएन–डीडब्ल्यू–१८–१–एच–डी या शोधविहिरीचे खोदकाम शनिवारी सुरू झाल्याची माहिती ओएनजीसीने दिली.

ओएनजीसीच्या मते, या मोहिमेद्वारे भारताच्या खोल आणि अतिखोल समुद्री भागांतील खनिज तेल व नैसर्गिक वायूच्या साठ्यांचा शोध घेण्याचे उद्दिष्ट आहे. ही मोहीम देशातील आतापर्यंतच्या सर्वात आव्हानात्मक खोल समुद्री शोध मोहिमांपैकी एक मानली जात आहे.

कंपनीने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या उपक्रमामुळे देशांतर्गत खनिज तेल व नैसर्गिक वायूचे उत्पादन वाढविणे, आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि भारताची ऊर्जा सुरक्षा अधिक मजबूत करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. वाढत्या ऊर्जा गरजांच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत हायड्रोकार्बन अर्थात खनिज तेल व वायूच्या साठ्यांचा शोध हा केंद्र सरकारच्या ऊर्जा धोरणाचा महत्त्वाचा भाग मानला जात आहे.

## अख डीपफेकचा राजकारणात शिरकाव? पीयूष गोयल यांच्या कथित 'विद्यार्थी धमकी' व्हिडिओवर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) आधारित डीपफेक तंत्रज्ञानाच्या वाढत्या गैरवापरावर केंद्र सरकारने मोठी कारवाई सुरू केली आहे. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांचा विद्यार्थ्यांना धमकी दिल्याचा भास निर्माण करणारा कथित अख–निर्मित डीपफेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर, त्या व्हिडिओशी संबंधित अनेक सोशल मीडिया लिंक हटविण्यात आल्याची माहिती सरकारी सूत्रांनी शनिवार, २५ जुलै २०२६ रोजी दिली.

हा व्हिडिओ देशभरात सुरू असलेल्या छएएढ परीक्षा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाला होता. या संपादित व्हिडिओमध्ये पीयूष गोयल हे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांविरोधात कथितपणे धमकीची भाषा वापरत असल्याचा आभास निर्माण करण्यात आला होता. मात्र, केंद्रीय मंत्र्यांनी हा व्हिडिओ पूर्णपणे बनावट, दिशाभूल करणारा आणि अख च्या साहाय्याने छेडछाड केलेला असल्याचा दावा केला आहे.

पीयूष गोयल यांनी स्पष्ट केले की, संसद भवनाबाहेर प्रसारमाध्यमांशी त्यांनी केलेल्या प्रत्यक्ष वक्तव्यामध्ये छेडछाड करून त्याचा विपर्यास करण्यात आला. त्यांनी या प्रकरणी पोलीस तक्रारही दाखल केली असून, जनतेची दिशाभूल करण्यासाठी अख चा बेजबाबदार वापर कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असा इशाराही दिला. सरकारी सूत्रांच्या माहितीनुसार, संबंधित डीपफेक व्हिडिओ पसरविणाऱ्या अनेक सोशल मीडिया पोस्ट आणि त्यांच्या लिंक हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. चुकीची माहिती रोखण्यासाठी संबंधित प्लॅटफॉर्मशी समन्वय साधून आवश्यक ती कारवाई केली जात असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

## ग्रेट निकोबार प्रकल्पावर पुन्हा राजकीय वाद; 'हा सामरिक नव्हे, व्यावसायिक प्रकल्प' – जयराम रमेश यांचा राजनाथ सिंहांना टोला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

ग्रेट निकोबार बेटावरील महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्पावरून केंद्र सरकार आणि काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा वाद पेटला आहे. काँग्रेसचे राज्यसभा खासदार जयराम रमेश यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना नव्याने पत्र लिहून हा प्रकल्प राष्ट्रीय सुरक्षेसाठी अत्यावश्यक नसून मूलतः एक व्यावसायिक उपक्रम आहे असा दावा केला आहे. प्रकल्पाला सामरिक महत्त्व असल्याचे केंद्र सरकारचे स्पष्टीकरण त्यांनी फेटाळून लावत, त्यासाठी कृत्रिमरित्या सामरिक कारणे पुढे केली जात आहेत, असा आरोप केला.

राजनाथ सिंह यांनी १७ जुलै रोजी पाठविलेल्या उत्तरात ग्रेट निकोबार प्रकल्पाला हिंद महासागरातील भारताच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा उपक्रम असल्याचे म्हटले होते. त्यावर प्रत्युत्तर देताना रमेश यांनी सरकारचा दावा तथ्यहीन असल्याचे सांगत, प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट व्यावसायिक विकास असल्याचा पुनरुच्चार केला.

गेल्या दोन वर्षांत जयराम रमेश यांनी या प्रकल्पासंदर्भात पर्यावरण, आदिवासी व्यवहार, बंदरे व जलमार्ग आणि संरक्षण मंत्रालयांना अनेक पत्रे पाठविली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, या चार मंत्रालयांपैकी तीन मंत्रालयांनी उत्तर दिले असून संरक्षण मंत्रालयाचे अलीकडील उत्तरही समाधानकारक नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

ग्रेट निकोबार प्रकल्पामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे बंदर, विमानतळ, वीज प्रकल्प आणि नागरी पायाभूत सुविधा उभारण्याची योजना आहे. मात्र पर्यावरणीय परिणाम, जैवविविधतेवरील धोका आणि स्थानिक आदिवासी समुदायांवर होणाऱ्या परिणामांमुळे हा प्रकल्प सुरुवातीपासूनच वादाच्या केंद्रस्थानी राहिला आहे. आता या प्रकल्पाच्या सामरिक गरजेवरूनही केंद्र सरकार आणि विरोधकांमध्ये नवा संघर्ष निर्माण झाला आहे.

## झिम्बाब्वेवर पुन्हा भारताची दणदणीत मात! ९० धावांनी विजय मिळवत टी-२० मालिका खिशात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हरारे । वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाने झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी–२० मालिकेत सलग दुसरा विजय मिळवत मालिका आपल्या नावावर केली आहे. शनिवार (२५ जुलै) रोजी हरारे स्पोर्ट्स क्लबवर झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारताने झिम्बाब्वेचा ९० धावांनी पराभव करत मालिकेत २–० अशी अभेद्य आघाडी घेतली.

नाणेफेक जिंकून झिम्बाब्वेने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र भारतीय फलंदाजांनी आक्रमक फलंदाजी करत २० षटकांत ५ बाद २१९ धावा उभारल्या. ईशान किशन याने अवघ्या ४४ चेंडूत ८१ धावांची दमदार खेळी केली, तर तिलक वर्मा याने २९ चेंडूत नाबाद ६० धावा फटकावत संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवले. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी ९४ धावांची भागीदारी रचून सामन्यावर भारताची पकड मजबूत केली.

२२० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात आक्रमक झाली. सलामीवीर ब्रायन बेनेट याने १९ चेंडूत ३२ धावा करत काही आकर्षक फटके खेळले. मात्र त्याच्या बाद झाल्यानंतर झिम्बाब्वेचा डाव गडगडला आणि संपूर्ण संघ १७.५ षटकांत १२९ धावांवर सर्वबाद झाला.

भारतीय गोलंदाजांनीही प्रभावी कामगिरी केली. अभिषेक शर्मा याने ३ बळी १७ धावा देत झिम्बाब्वेच्या मधल्या




फळीला धक्का दिला, तर टी–२० आंतरराष्ट्रीय पदार्पण करणाऱ्या यश ठाकूर याने २ बळी ३० धावा घेत संस्मरणीय सुरुवात केली.

याआधी पहिल्या सामन्यात भारताने ७ गडी राखून विजय मिळवला होता. दुसऱ्या विजयासह भारताने मालिका आधीच जिंकली असून आता २६ जुलै रोजी होणाऱ्या तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात झिम्बाब्वेला व्हाईटवॉश देण्याचे लक्ष्य असेल. युवा खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे भारताचा संघ आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठीही अधिक आत्मविश्वासाने सज्ज असल्याचे या मालिकेतून दिसून आले आहे.

# सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय; न्यायालयीन सुनावणीचे अनधिकृत व्हिडिओ-ऑडिओ प्रसारणावर अंतरिम बंदी

## सर्वोच्च न्यायालयासह देशातील सर्व उच्च न्यायालयांना आदेश लागू; पत्रकारितेच्या निष्पक्ष वृत्तांकनाला मात्र अपवाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

सोशल मीडिया आणि इतर डिजिटल माध्यमांवर न्यायालयीन कामकाजाचे अनधिकृत ऑडिओ–व्हिडिओ रेकॉर्डिंग, त्यामध्ये फेरफार (एडिटिंग) करून प्रसारित करणे तसेच अशा क्लिप्स शेअर करण्यावर सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम बंदी घालणारा महत्त्वपूर्ण आदेश दिला आहे. न्यायालयाच्या कामकाजाचा विपर्यास करून न्यायव्यवस्थेची प्रतिमा मलीन होऊ नये, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या आदेशानुसार, कोणत्याही व्यक्तीला न्यायालयीन कामकाजाचे अनधिकृत व्हिडिओ किंवा ऑडिओ रेकॉर्ड करून ते सोशल मीडिया किंवा अन्य डिजिटल प्लॅटफॉर्मवर पोस्ट, रीपोस्ट, एडिट किंवा अपलोड करता येणार नाहीत. अशा प्रकारच्या कोणत्याही



प्रसारणासाठी संबंधित न्यायालयाच्या सचिवांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की हा आदेश केवळ सर्वोच्च न्यायालयापुरता मर्यादित नसून देशातील सर्व उच्च न्यायालयांनाही लागू असेल. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेचे अनधिकृत चित्रीकरण आणि त्याचा डिजिटल माध्यमांद्वे प्रसार यावर देशभरात समान नियम लागू होतील. मात्र, न्यायालयाने पत्रकारितेच्या स्वातंत्र्यालाही महत्त्व दिले आहे. न्यायालयीन कामकाजाचे अचूक, वस्तुनिष्ठ आणि निष्पक्ष वृत्तांकन करण्यावर या आदेशाचा कोणताही परिणाम होणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. म्हणजेच, माध्यमांना सुनावणीचे तथ्याधारित वृत्त देण्यास मुभा कायम राहणार आहे. अलिकडच्या काळात न्यायालयीन सुनावणीतील काही निवडक दृश्ये किंवा ध्वनिचित्रफिती संपादित करून दिशाभूल करणाऱ्या पद्धतीने प्रसारित केल्या जात असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. यामुळे न्यायालयीन प्रक्रियेबाबत चुकीचे आकलन निर्माण होण्याची तसेच न्यायसंस्थेच्या विश्वासार्हतेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने हा अंतरिम आदेश जारी केला आहे.

कायदेतज्ज्ञांच्या मते, हा निर्णय न्यायालयीन पारदर्शकता आणि न्यायसंस्थेची प्रतिष्ठा यांच्यात समतोल राखण्याचा प्रयत्न आहे. अंतिम निर्णय होईपर्यंत न्यायालयीन कामकाजाच्या डिजिटल प्रसारणाबाबतचे नियम अधिक स्पष्ट होण्याची शक्यता असून, सोशल मीडिया वापरकर्ते, कंटेंट क्रिएटर्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मना या आदेशाचे काटेकोर पालन करावे लागणार आहे.

# नात्यांवर गुन्ह्यांची सावली? वैवाहिक वादांमध्ये नातेवाईकांना आरोपी बनवण्याच्या प्रवृत्तीवर सर्वोच्च न्यायालयाची तीव्र नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

वैवाहिक वाद केवळ पती–पत्नीपुरते मर्यादित न राहता संपूर्ण कुटुंबाला न्यायालयीन संघर्षात ओढले जात असल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने शनिवारी (२५ जुलै २०२६) गंभीर चिंता व्यक्त केली. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, वैवाहिक मतभेदांमध्ये सूड उगवण्यासाठी सासरच्या नातेवाईकांना गुन्हेगारी खटल्यांमध्ये गोवण्याची प्रवृत्ती वाढत असून, अशा प्रकरणांमध्ये अनेकदा लहान मुलांचाही वापर एकमेकांना बदनाम करण्यासाठी केला जातो. न्यायालयाने अशा प्रकारच्या गैरवापरावर कठोर शब्दांत नाराजी व्यक्त करत एका महिलेविरुद्ध दाखल करण्यात आलेला झजउड्ज (झऑींशलींळेप ेष उहळश्रवॲशप षऑ्र डशुर्रीश्र जषषशपलशी अलीं) अंतर्गत गुन्हा रद्द केला.

हे प्रकरण एका विवाहित जोडप्याच्या तीव्र वैवाहिक वादाशी संबंधित होते. पती–पत्नीमध्ये सुरू असलेल्या संघर्षादरम्यान पतीच्या जुळ्या मुलांच्या पितृकाकूवर (वडिलांची बहीण) झजउड्ज अंतर्गत गंभीर आरोप करण्यात आले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले की, संबंधित जोडप्याचा सप्टेंबर २०२३ मध्ये परस्पर संमतीने घटस्फोट झाला होता. तरीही त्यानंतरही कुटुंबातील इतर सदस्यांना गुन्हेगारी कारवाईत ओढण्याचा प्रयत्न सुरू राहिला.

या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने बॉम्बे उच्च न्यायालयाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. उच्च न्यायालयाने उपलब्ध पुराव्यांचा आणि नोंदींचा सखोल विचार न करता प्रकरण रद्द करण्यास नकार दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, कोणत्याही व्यक्तीविरुद्ध, विशेषतः झजउड्ज सारख्या अत्यंत गंभीर कायद्यांतर्गत आरोप कायम ठेवण्यापूर्वी न्यायालयाने उपलब्ध कागदपत्रे, घटनाक्रम आणि पुरावे बारकाईने तपासणे आवश्यक आहे.

न्यायालयाने आपल्या निरीक्षणात नमूद केले की, भारतात वैवाहिक वादांमधून उद्भवणाऱ्या फौजदारी खटल्यांमध्ये अनेकदा संपूर्ण सासरच्या कुटुंबाला आरोपी बनवले जाते. काही प्रकरणांमध्ये वृद्ध पालक, विवाहित बहिणी, दूरचे नातेवाईक आणि कुटुंबाशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या व्यक्तींनाही आरोपी करण्यात येते. न्यायालयाच्या मते, अशा पद्धतीमुळे न्यायव्यवस्थेवर अनावश्यक ताण येतो आणि निष्पाप व्यक्तींना वर्षानुवर्षे न्यायालयीन लढाईला सामोरे जावे लागते.

विशेष म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयात मुलांच्या हितालाही प्राधान्य दिले. वैवाहिक संघर्षात अल्पवयीन मुलांना मानसिक, भावनिक किंवा कायदेशीर शस्त्र म्हणून वापरणे अत्यंत धोकादायक असल्याचे न्यायालयाने नमूद केले. मुलांच्या संरक्षणासाठी बनवलेल्या झजउड्ज कायद्याचा वापर जर वैयक्तिक सूड किंवा कौटुंबिक संघर्षासाठी होऊ लागला, तर त्या कायद्याच्या मूळ उद्देशालाच धक्का बसतो, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

भारतात वैवाहिक वादांशी संबंधित गुन्हेगारी प्रकरणांची संख्या मोठी आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (छउठइ) च्या आकडेवारीनुसार, दरवर्षी हजारो प्रकरणे कौटुंबिक अत्याचार, हुंडाबळी, महिलांवरील अत्याचार आणि वैवाहिक वादांशी संबंधित कायद्यांखाली नोंदवली जातात. अशा परिस्थितीत गंभीर कायद्यांचा वापर योग्य हेतूने होणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्यांचा संभाव्य गैरवापर रोखणेही न्यायव्यवस्थेची जबाबदारी असल्याचे या निर्णयातून अधोरेखित झाले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय केवळ एका आरोपीची निर्दोष मुक्तता नसून, न्यायालयांनी आणि तपास यंत्रणांनी गंभीर गुन्ह्यांच्या आरोपांकडे संतुलित, पुराव्याधारित आणि जबाबदारीने पाहावे, असा स्पष्ट संदेश देणारा ठरतो. वैवाहिक मतभेदांचे गुन्हेगारीकरण करताना निष्पाप नातेवाईकांना आरोपी बनवणे आणि मुलांना संघर्षाचे साधन बनवणे, ही प्रवृत्ती थांबवण्याची वेळ आली असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निरीक्षणातून अधोरेखित केले आहे.